

# मेट्रो-३चे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मधील कफ परेड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतींच्या भागांत भुयारीकरण पूर्ण झाल्याची घोषणा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे करण्यात आली. मेट्रो ३चे आतापर्यंत ९६ टक्के अर्थात ५२ किमीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा अप-लाइन मार्गाचा ५५७ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४०५ रिंग्जच्या सहाय्याने १४९ दिवसांत पूर्ण झाला. या भुयारीकरणाच्या टप्प्यासह पॅकेज-१ मधील भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले आहे. 'मंगळवारी गाठलेल्या भुयारीकरणाच्या टप्प्यामुळे मेट्रो-३च्या एकूण सातपैकी सहा पॅकेजचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे ऐतिहासिक वारसा इमारतीनजीक भुयारीकरण करणे हे या प्रकल्पातील अनेक आव्हानांपैकी एक होते. आमच्या अभियंत्यांनी व कामगारांनी सर्व सुरक्षेविषयक दक्षता घेत हे काम कौशल्यपूर्ण पद्धतीने पूर्ण केले, याचा मला आनंद वाटतो,' असे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

## पॅकेज-१मधील भुयारीकरण

- कफ परेड ते विधान भवन (अप लाइन १२२८ मी., डाऊन लाइन १२५४ मी.)
- विधान भवन ते चर्चगेट (अप लाइन ४९८ मी., डाऊन लाइन ४८१ मी.)
- चर्चगेट ते हुतात्मा चौक (अप लाइन ६५४ मी.)
- हुतात्मा चौक ते सीएसएमटी (अप लाइन ५५७ मी., डाऊन लाइन ५६९मी.)